DISTRICT AND SESSIONS COURT, JALNA

Survey No - 488, Bypass Road, Jalna 431203

Web-https://jalna.dcourts.gov.in/ Email - mahjaldc@mhstate.nic.in

जिल्हा न्यायालय जालना/संगणक/ निविदा/ ४३८९/२०२५ दिनांक :- ०४/०८ /२०२५

जाहीर निविदा

जिल्हा न्यायालय जालना अंतर्गत बाल न्यायालय, जालना येथे जिल्हा न्यायालयाची सी.आय.एस प्रणाली कार्यान्वीत करणेसाठी कौटुंबिक न्यायालय जालना किंवा औद्योगिक व कामगार न्यायालय जालना इमारत येथून बाल न्यायालय जालना इमारत येथे लॅनद्वारे किंवा पॉइट टू पॉईट प्रोटोकॉल कनेक्टीव्हीद्वारे सी.आय.एस प्रणाली (सर्व साहित्यासह+प्रस्थापनासह+सर्व करांसहित) कार्यान्वीत करणेसाठी इच्छुक पुरवठादारांकडून मोहरबंद पाकिटात दरपत्रके दिनांक ०८-०८-२०२५ रोजीपर्यत दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदरील जाहिर निविदा व त्याचे अटी व शर्ती या जिल्हा न्यायालयाचे संकेतस्थळ https:// jalna.dcourts.gov.in यावर प्रकाशित करण्यात येत आहे.

सदरबाबत पुरवठाधारकाने निविदा या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जालना यांचे नांवे अग्रेषित मोहरबंद लखोटयात दिनांक ०८-०८-२०२५ रोजीपर्यत (सुटीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेपर्यत म्हणेजच सांयकाळी ६:०० वाजेपर्यत किंवा त्यापुर्वी जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या कार्यालयात सादर कराव्यात. तद्नंतर प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रकाचा प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

दरपत्रके खालील नमुन्यात सादर करावे

प्रकार १-

कामाचे स्वरुप	एकूण दर (दर हे सर्व कर/ जीएसटी/ सीएसटी सह यंत्रणा प्रस्थापित करणेसह नमूद करावे)
कौटुंबिक न्यायालय जालना किंवा औद्योगिक व कामगार न्यायालय जालना येथून सिंगल कोअर फायबर ऑप्टीक अंदाजे ४५० मीटर, गिगाबाईट मिडिआ कन्वर्हटर २ नगासह (सर्व किरकोळ साहित्यासह + प्रस्थापनासह) व टेस्टींग करुन कार्यिन्वत करणेसह लागणा-या खर्चाचे दरपत्रक	

प्रकार २-

कामाचे स्वरुप	एकूण दर (दर हे सर्व कर/ जीएसटी/ सीएसटी सह यंत्रणा प्रस्थापित करणेसह नमूद करावे)
पॉईन्ट टू पॉईन्ट प्रोटोकॉल कनेक्टीव्ही करणेसाठी (सर्व साहित्यासह + प्रस्थापनासह) टेस्टींग करुन प्रस्थापनासह लागणा-या खर्चाचे दरपत्रक	

निविदा सादर करतांना उक्त नमूद दोन्ही प्रकारात नमूद या कार्यालयास सादर कराव्यात. निविदा सादर झाल्यानंतर कोणत्या प्रकारचे निविदा स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे संपूर्ण अधिकार खरेदी समिती जिल्हा न्यायालय यांना राहतील.

सदर निविदा/दरपत्रक लखोटयावर " **बाल न्यायालय जालना येथे पॉईट टू पॉईट प्रोटोकॉल कनेक्टीव्ही करणेबाबत दरपत्रक** " असा ठळक अक्षरात उल्लेख करावा.

हे कार्यालय कोणतेही कारण न सांगता प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रके स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखून ठेवत आहे.

अटी व शर्ती

१. मोहरबंद/सीलबंद लखोटयावर " बाल न्यायालय जालना येथे पॉईट टू पॉईट प्रोटोकॉल कनेक्टीव्ही करणेबाबत दरपत्रक " असा ठळक अक्षरात उल्लेख करावा व ते जिल्हा व सत्र न्यायालय जालना येथे सादर करावीत.

२. दरपत्रकातील/ निविदेमधील नमूद दर हे सर्व करांसहित तसेच बसवून देणेसह आणि पडताळणीसह नमूद करावेत.

३. आदेश दिल्यानंतर नमूद पॉइट टू पॉईट प्रोटोकॉल कनेक्टीव्ही कार्यान्वीत करुन देणे बंधनकारक राहील. तसेच सदरबाबत दरपत्रकात नमूद दराशिवाय अधिकचा दर आकारता येणार नाही. साहित्याबाबत कोणताही जास्तीचा दर आकारता येणार नाही.

४. पुरवठाधारकाने दरपत्रके सादर करण्याआगोदर औद्योगिक न्यायालय, जालना, फौजदारी न्यायालय, जालना ते बाल न्याय मंडळ या दोन्ही इमारतीतील अंतराची पाहणी करुन व दोन्ही इमारतीतील अंतराची पडताळणी करुनच दरपत्रके सादर करावीत.

५. सदरील पॉइट टू पॉईट प्रोटोकॉल कनेक्टीव्हीद्वारे जोडणी केल्यानंतर ५ वर्षापर्यत सदरील जोडणीमध्ये काही दोष उत्पन्न झाल्यास तो तात्काळ दूर करुन द्यावा लागेल. सदरल दोषाचे निराकण करण्यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क दिले जाणार नाही.

६. कोणतेही दरपत्रके स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा हक्क जिल्हा न्यायालय खरेदी समिती जालना हे राखून ठेवीत आहे.

७. प्रत्येक पुरवठाधारकाने फक्त एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

८. जोडणीतील दोषासंदर्भात तक्रार नोंदविल्यानंतर २४ तासांच्या आत सदरील जोडणीतील दोष दुरुस्त करुन कनेक्टीव्हीटी करुन द्यावी लागेल.

९. सदरहु जोडणीसाठी वापरण्यात येणारे संगणक साहित्य हे उच्च दर्जाचे व त्यात किमान ५ वर्ष तरी दोष येणार नाही अशा पध्दतीने प्रस्थापित करावे लागेल.

१०. देयकात नमूद कनेक्टीव्हीटीचे दर हे (सर्व साहित्यासह+प्रस्थापनासह+सर्व करांसहित) नमूद करावे. नमूद दरापेक्षा अधिकचे दर आकारल्यास ते अदा केले जाणार नाही.

११. सदर प्रस्तावाबाबत दरपत्रक रद्द करणे / बदल करणेचा अधिकार खरेदी सल्लागार समिती, जिल्हा न्यायालय जालना यांना राहील.

१२. आदेशानुसार काम न केल्यास किंवा अटीचे उल्लंघन केल्यास कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही क्षणी कुठलीही सबब न देता सदरील आदेश संपूर्णतः रद्द करण्याचे अधिकार जिल्हा न्यायालय जालना यांना राहतील.

१३. दरपत्रक लिफाफामध्ये खालील कागदपत्रे सादर करावीत..
आस्थापना व दुकाने अधिनियम लायसन्स प्रमाणपत्राची प्रत, पॅनकार्डची प्रत, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

१४. सदरची जाहिरात जिल्हा न्यायालय जालनाच्या संकेतस्थळावर (https://jalna.dcourts.gov.in) वर प्रसिध्द करण्यात येईल.

१५. निविदाधारकांनी दरपत्रके/ निविदा जिल्हा न्यायालय जालना येथे दिनांक ०८-०८-२०२५ रोजीपर्यत (सुटीचे दिवस वगळून) सायंकाळी ६-०० वाजेपर्यत पाठविणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.

आदेशान्वये
04/08/25
प्रबंधक
जिल्हा न्यायालय जालना.

दिनांक:- 04/08/25